**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख रियाज इब्राहीम, : अपीलकर्ता
व्दारा- एकबाल शाह निसार, हलदी गल्ली, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५१

२ सुनावणीची तारीख दि. ०१-०२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. शेख रियाज इब्राहीम : उपस्थित
- प्रतिनिधी - श्री. एकबाल शाह

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,
वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद
- प्रतिनिधी - श्री. एस. एस. राऊत, लिपिक

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद - श्री. राजीव शिंदे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २७-१०-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २२-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २७-०१-२००९<br>फेरसादर दि.<br>१०-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या ५ मुद्दयांपैकी ४ मुद्दयांची माहिती आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ते ती अपिलार्थीस देऊ शकतात. आयोगासमोर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली, अपिलार्थीने ती स्विकारली. आयोगाने अपिलार्थीस असे सूचित केले की, त्यांना आज रोजी आयोगासमोर प्राप्त झालेल्या माहितीची त्यांनी पाहणी करावी व त्या माहितीमध्ये काही माहिती अपुरी असेल तर त्याबाबत त्यांनी १५ दिवसाच्या आत जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वैजापूर यांच्याकडे लेखी मागणी करावी व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वैजापूर यांनी १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस ती माहिती द्यावी. तसेच अपुरी किंवा चुकीची माहिती आढळून आल्यास त्यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे अर्ज करावा व जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी या प्रकरणाकडे लक्ष पुरवून प्रकरण निकाली काढावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख रियाज इब्राहीम, व्दारा- एकबाल शाह निसार, हलदी गल्ली, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दशरथ एन. सुरडकर,<br>रमानगर, नर्सरीजवळ, टिळक नगरच्या बाजूला जैनोदीन कॉलनी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, अपंग निवासी विद्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, अपंग निवासी विद्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद<br>- श्रीमती कोलते संगिता यशवंत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. आर. व्ही. निकम, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. प्रशांत गायकवाड, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता,<br>समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०-०१-२००९ फेरसादर दिनांक ११-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि श्री. प्रशांत गायकवाड, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती प्रथमतः त्यांना दिनांक २९-०९-२००८ रोजी घरपोच दिली आहे. त्यावर अपिलार्थीची पोच आहे. तथापि अपूर्ण माहिती मिळाली आहे अशी त्यांनी नोंद केली आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा एकदा दिनांक १८-१०-२००८ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिका-याने आयोगास पुढे असेही सांगितले की, आता अपिलार्थीस पूर्ण माहिती देण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास पाठविलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर १० दिवसांनी त्यांना जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अपंग निवासी विद्यालय, सिल्लोड यांच्याकडून परीपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व त्यामुळे त्यांचे व्दितीय अपील ते मागे घेत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दशरथ एन. सुरडकर, रमानगर, नर्सरीजवळ, टिळक नगरच्या बाजूला जैनोदीन कॉलनी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अपंग निवासी विद्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्र रंगनाथ काजळे (बंदी क्र. सी/६७९४),<br>औरंगाबाद खुले कारागृह,<br>औरंगाबाद (हर्सूल) | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>खुले जिल्हा कारागृह, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तुरुंगाधिकारी श्रेणी-२, खुले जिल्हा कारागृह, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. विलास भि. साबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. अशोक शंकर कदम,<br>तुरुंगाधिकारी श्रेणी-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४-०८-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी हे आय. पी. सी. कलम ३०२ खाली शिक्षा भोगत आहेत. अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज केला तेव्हा ते नाशिक येथे मध्यवर्ती कारागृहामध्ये होते. त्यांचा माहितीसाठीचा अर्ज खुले जिल्हा कारागृह, पैठण यांना दिनांक १४-०८-२००८ रोजी प्राप्त झाला, यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिलेली आहे. यानुसार जन माहिती अधिकारी यांच्या मते त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार ३० दिवसाच्या आत म्हणजे विहित मुदतीत माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी हे कारागृहात असल्यामुळे कारागृहातील प्रशासनाची त्यांच्यावर सततची देखरेख असते आणि त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता नाही, त्यामुळे अपिलार्थी यांनी त्यांना ४८ तासाच्या आत माहिती मिळण्याची केलेली मागणी योग्य नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह, पैठण यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २७-११-२००८ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी नियमाच्या अधीन राहून संपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तसेच जी माहिती नियमाप्रमाणे देता येत नाही अशी माहिती देखील दिलेली आहे. तसेच ब-याच मुद्दयांवर अपिलार्थीचे समाधान झाले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जी त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे, ती या सर्व पार्श्वभूमीवर व त्रयस्थ पक्षाच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (छ) अन्वये नाकारली आहे. आयोगास पुढे असेही सांगण्यात आले की, अपिलार्थी हे आता नाशिक मध्यवर्ती कारागृह येथून खुले कारागृह, औरंगाबाद येथे वर्ग करण्यात आले आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे या प्रकरणात त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये ४८ तासात माहिती देय होणार नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र रंगनाथ काजळे (बंदी क्र. सी/६७९४), औरंगाबाद खुले कारागृह, औरंगाबाद (हर्सूल).

२. जन माहिती अधिकारी तथा तुरुंगाधिकारी श्रेणी-२, खुले जिल्हा कारागृह, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपीलकर्ता
अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद - श्री. वामन कदम | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक १६-११-२००८ रोजी व्यक्तिशः देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती मिळाली आहे अशी पोच सुध्दा दिलेली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन ही बाब सिध्द होत आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १९-११-२००८ रोजी निर्णय घेताना अपिलार्थी यांना आवश्यक माहिती मिळाली असल्याने त्यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे असे नमूद केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, : अपीलकर्ता
गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. पंचमल्ले एस. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद - श्री. मुकिम देशमुख | : | उपस्थित |
| ३.४ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद<br>- स्नेहा अरुण देव | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३१-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तत्कालीन व सध्याचे, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास विनंती केली की, सदरहू प्रकरणामध्ये सद्यस्थिती आयोगास अवगत करण्याकरिता काही कालावधी देण्यात यावा. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपीलकर्ता
एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किशोर भिकनसिंग राजपूत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०१-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर नोंद आयोग घेत आहे. अपिलार्थी उपस्थित आहेत. अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही असे आढळून येत आहे. याबाबत आयोगास सद्यस्थिती अवगत होणे आवश्यक आहे त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, : अपीलकर्ता
बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औरंगाबाद - श्री. एम. एल. पवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्री. वामन कदम | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८-०१-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीबाबत प्रथमतः त्यांना दिनांक ०५-०१-२००९ रोजी पुरवठा विभागाकडे ही माहिती उपलब्ध आहे असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत संबंधितांनी माहिती द्यावी असा दिनांक २८-०१-२००९ रोजी निर्णय दिला आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०२-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, संबंधित माहिती ही भारत सरकारच्या अधिकारातील कार्यालय / उपक्रमाकडून प्राप्त होऊ शकेल व त्याचा तपशील दिला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ही बाब नमूद केली की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही भारत सरकारच्या अधिकारातील उपक्रम / कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकते. सदरचे प्रकरण हाताळण्यामध्ये जन माहिती अधिका-याचा संभ्रम झालेला आढळून येत आहे. याकरिता अपिलार्थी यांनी मागितलेली एकूण ११ मुद्दयांपैकी त्याच्या कक्षेत जे मुद्दे येतात (मुद्दा क्रमांक १, ७, ८ व ११) त्या मुद्दयांची माहिती ते देऊ शकतात व ती द्यावी लागेल असे आयोगाचे मत आहे. उर्वरीत मुद्दयांकरिता अपिलार्थी यांना भारत सरकारच्या सक्षम कार्यालय किंवा उपक्रमाकडे स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मुद्दा क्रमांक १, ७, ८ व ११ अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०२-२०११**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद- श्री. रुपेश लक्ष्मणराव सिंगारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर विभागीय आयुक्त,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. आर.एम.साळोक, नायब तहसीलदार (अपील) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांचा दि.१२.१२.२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. या अर्जाच्या संदर्भात दि. ०५.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकाऱ्याकडे प्राप्त झालेला नाही. अर्जदार यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये परत अर्ज सादर करावा व अपिलार्थी यांचा अर्ज प्राप्त झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार त्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार पुन्हा अर्ज सादर केला किंवा कसे, याबाबत कळू शकले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज सांगितले की, त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत प्राप्त झालेली नाही. आयोगाकडे उपलब्ध असलेल्या अर्जाची प्रत आयोगातर्फे जन माहिती अधिकारी यांना आज समक्ष देण्यात आली. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील सद्यस्थिती कळवावी लागेल तसेच त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,अंबाली निवास, समतानगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), महसूल शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष रामदास करपे, : अपीलकर्ता
साळीवाडा, खुलताबाद, तालुका खुलताबाद,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,
तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय दंडाधिकारी, कार्यालय उपविभागीय
दंडाधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५९
२ सुनावणीची तारीख दि. ०१-०२-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,
तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद
- सौ. छाया व्ही. पवार
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,
तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १६-१०-२००८
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०७-११-२००८

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीवर तहसीलदार यांनी दिनांक ०७-११-२००८ रोजी अपिलार्थीस कळविले आहे त्यावरुन असे दृष्टोत्पत्तीस येते की, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीसंदर्भात तहसीलदार, खुलताबाद यांनी खुलासा दिलेला आहे व इतर कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध आहे त्याबाबत संदर्भ नमूद केलेले आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना मिळालेल्या माहितीमध्ये तहसील कार्यालयाकडून कोणती अचूक माहिती मिळाली नाही याबाबत स्पष्टपणे तहसील कार्यालयास १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस कळवावे लागेल व त्यावर तहसील कार्यालयातील जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस १५ दिवसात कळविणे आवश्यक राहील.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष रामदास करपे, साळीवाडा, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर लहानुजी खैरे,<br>शिवशंकर कॉलनी, तानाजी चौकाच्या दक्षिणेकडे,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. पी. व्ही. सावंत | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०४-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले नाही त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही. जन अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या परिस्थितीत जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घ्यावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर लहानुजी खैरे, शिवशंकर कॉलनी, तानाजी चौकाच्या दक्षिणेकडे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रत्नशेखर प्रेमचंद साहुजी, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड - डॉ. ज्योत्स्ना सुभाष धुळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी - प्रतिनिधी - श्री. एस.डी.कुलकणी, अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी या पदाचा नुकताच जानेवारी,२०११ मध्ये कार्यभार स्वीकारलेला आहे व त्यांनी या प्रकरणाच्या कागदपत्रांची छाननी केली असून त्यांना असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे ती माहिती संकलीत करुन मागितली आहे. त्यामुळे त्यांना ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही, असा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १३.०३.२००९ रोजी निर्णय घेऊन अर्जदाराने कार्यालयात उपस्थित राहून संचिका पाहून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतींची मागणी करावी, असे सूचित केले आहे.

अपिलार्थी स्वातंत्र्य सैनिकाबाबत माहिती मागत आहेत व माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या उदात्त धोरणाकडे पाहून अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी देणे योग्य झाले असते, असे आयोगाचे मत आहे. अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती ही स्वातंत्र्यसैनिकांबाबतची असून यामध्ये - (१) स्वातंत्र्यसैनिकाचे पूर्ण नाव, पत्ता,फोन क्रमांक, (२) हयात/मृत, (३)जात/धर्म, (४)सहभाग असलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाचे नाव जसे मराठवाडा,हैद्राबाद,गोवा,देश स्वातंत्र्य, (५) निवृत्तीवेतन कोणाकडून मिळते - राज्य सरकार/ केंद्र सरकार, (६) स्वातंत्र्यसंग्रामात केलेल्या कार्याचा थोडक्यात तपशील - असा माहितीच्या मागणीचा तपशील आहे. यामधील मुद्दा क्र. १,२,४ व ५ या मुद्यांची माहिती शासकीय दस्तऐवजामध्ये उपलब्ध असू शकते, असे आयोगाचे मत आहे. ही माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात छायांकित प्रतीमध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल व ही कार्यवाही पूर्ण होईल, असे अपर जिल्हाधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांना पहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक यांनी अपिलार्थीने मागणी केलेली वर नमूद केल्याप्रमाणे माहिती जिल्हाधिकारी कार्यालयात ज्या स्वरुपात उपलब्ध असेल, त्या स्वरुपात छायांकित साक्षांकित प्रतीमध्ये आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रत्नशेखर प्रेमचंद साहुजी, गोमटेश इलेक्ट्रॉनिक्स, सराफा रोड, खादी भांडारासमोर, औरंगाबाद - ४३१००१

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कमलाकर विष्णूपंत बाबरेकर, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, खुलताबाद, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कमलाकर विष्णूपंत बाबरेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल),खुलताबाद,जि.औरंगाबाद - सौ. छाया व्ही. पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, खुलताबाद, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०१.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०४.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती पुरविली आहे. तथापि या अर्जाकडे त्या पुन्हा लक्ष देऊन उर्वरित माहिती देण्याचा प्रयत्न करतील. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास आज असे अवगत केले की, चार मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ च्यासंदर्भात माहिती पुरविली आहे. मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. ती मुद्देनिहाय खालीलप्रमाणे आहे.

(१) जानेवारी, ८६ ते मे, ८६ पर्यंत शेती व फेरफार प्रकरणात किती निकाल दिले, त्यांची संख्या व नामावली.

(२) जानेवारी,८६ या महिन्यामध्ये शेतीचे किती फेरफार व वहिती नोंदीचे निकाल दिले. त्यातील दोन निकालाच्या प्रतीची छायांकित प्रत किंवा जानेवारी,८६ ते मे,८६ या कालावधीत दिलेल्या कोणत्याही दोन निकालाच्या सत्यप्रती.

(३) तहसीलदार यांनी मार्च,८६ या महिन्यात किती फेरफार नोंदीबाबत व इतर निकाल दिले. त्यापैकी कोणत्याही दोन निकालाच्या प्रती अथवा निकाल दिले नसतील तर तसे कळवावे.

या माहितीच्या मागणीचा अपिलार्थी यांनी आयोगापुढे त्यांच्या युक्तिवादामध्ये पुनरुच्चार केला. तरी आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस सदरची माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सुनावणीच्या दरम्यान अपिलार्थीने आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी याच माहितीकरिता दुसरा एक अर्ज सादर केला होता. या अर्जाच्या संदर्भात त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना उशिरा प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विचाराधीन प्रकरणामध्ये अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झाला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २०(१) अन्वये ` २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत,असे आयोगाचे मत झाले आहे या बाबत त्यांना खुलासा द्यावा लागेल.या आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यास तामिल करावयाची जबाबदारी विद्यमान तहसीलदार,खुलताबाद यांची राहील.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

१) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,खुलताबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य द्यावी.

२) अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविणे आवश्यक आहे, या मुदतीत माहिती पुरविण्यात आलेली नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,खुलताबाद

यांनी अधिनियमातील कलम २०(१) खाली त्यांना ` २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,खुलताबाद यांचेमार्फत आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कमलाकर विष्णूपंत बाबरेकर, १३, रघुविरनगर, मारोती मंदिराजवळ, सेंट फ्रान्सिस शाळेसमोर, जालना रोड,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, खुलताबाद,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रंगनाथराव धोकटे,<br>गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कें. प्रा. शा. मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कें. प्रा. शा. मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. काळूंखे देवचंद विश्वनाथ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. पंचगल्ले एस. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०५-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०३-०३-२००९ रोजी देण्यात आलेली आहे व ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः घेतली आहे आणि त्याची पोहच त्यांनी दिनांक १६-०३-२००९ रोजी दिली आहे. ही बाब कागदपत्रावरुन सिध्द होत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कें. प्रा. शा. मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शरद गणपत भोकरे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सजा सातारा,ता.जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
तहसील कार्यालय,औरंगाबाद.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-यान उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०५.२००९ (फेरसादर-दि.२९.१०.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे

ढकलण्याची येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शरद गणपत भोकरे, एच.आय.जी.-१,सेक्टर बी-८२,ठाकरे नगर,एन-२,सिडको,औरंगाबाद ४३१ ००३

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा सातारा,ता. जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल छन्नुलाल विश्वासू, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रबंधक,
महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रबंधक,
महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - स्वीय सहायक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), औरंगाबाद- श्री. ए.टी.पठाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०२.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०५.२००९ (फेरसादर दि. ०७.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी रजेवर असल्यामुळे त्या उपस्थित राहू शकल्या नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २६.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दि. २२.०१.२००९ रोजी देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २७.०२.२००९ रोजी सुनावणी घेऊन त्यासंदर्भात दि.०७.०३.२००९ रोजी निर्णय निर्गमित केला आहे व त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी देय असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे,असा निर्णय घेऊन अपील फेटाळले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज केलेला युक्तिवाद तसेच आयोगापुढे उपलब्ध असलेली कागदपत्रे यावरुन संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपप्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), औरंगाबाद यांनी प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये काहीही बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक : ०१-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल छन्नुलाल विश्वासू,रा. मातोश्रीनगर,शाळेच्या पाठीमागे, प्लॉट नं.७१, गल्ली नं.१०, बी.न्यायनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा  स्वीय सहायक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सतीश अंकुशराव देशमुख, : अपीलकर्ता
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :

अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सतीश अंकुशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बी.आर.राणे, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.११.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत, ही गंभीर बाब आहे, या बाबीची आयोग नोंद घेत आहे.उपस्थितांनी बाजू आयोगापुढे मांडली.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००९ रोजी सुनावणी घेऊन संबंधितास १५ दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असा निर्णय पारीत केला आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे हे सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगास सांगू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य द्याव्या लागतील अशी कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी करतील, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना व्यक्तिशः पहावे लागेल.

प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आतापर्यंत माहिती पुरविलेली नाही तसेच आयोगासमोर सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अटी व नियमांचे पालन करण्यात कसूर केली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. याव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० (१) अन्वये रुपये २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना तामील होईल, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना पहावे लागेल. या सर्व बाबी पाहता, सचिव, जलसंपदा यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये शिफारस करण्यात येतआहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिताराम सी. तुपे, डग्लस गर्ल्स शाळेजवळ, मोदिखाना, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. आर. जी. यादव, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी मार्फत अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद.

५. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, म. रा. पुणे, येरवडा-६, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रभुदास एस. भालेराव, : अपीलकर्ता
कमला रतन प्लाझा, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९७७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रभुदास एस. भालेराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. डी. एम. गलबे, कनिष्ठ अभियंता | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बी. आर. राणे, सहायक अधीक्षक अभियंता , लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | प्रत जोडली नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-१२-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. निर्णयावरील दिनांक अस्पष्ट |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००९ रोजी सुनावणी घेऊन संबंधितास १५ दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असा निर्णय पारीत केला आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे हे सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगास सांगू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य द्याव्या लागतील. अशी कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी करतील, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना व्यक्तिशः पहावे लागेल.

प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आतापर्यंत माहिती पुरविलेली नाही तसेच आयोगासमोर सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अटी व नियमांचे पालन करण्यात कसूर केली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. याव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० (१) अन्वये रुपये २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना तामील होईल, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना पहावे लागेल. या सर्व बाबी पाहता, सचिव, जलसंपदा यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये शिफारस करण्यात येतआहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभुदास एस. भालेराव, कमला रतन प्लाझा, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. आर. जी. यादव, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी मार्फत अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद.

५. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, म. रा. पुणे, येरवडा-६, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. डी. एम. गलबे, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सन २००७-२००८ या कालावधीची असून अत्यंत विस्तृत स्वरुपाची आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास ही बाब आढळून येत आहे. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०३-२००९ रोजी कळविले आहे की, सदरची माहिती व्यापक स्वरुपाची असल्यामुळे व उपविभागीय कार्यालयातील मनुष्यबळ अपुरे असल्यामुळे माहिती देणे शक्य होणार नाही व अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहितीची पाहणी देणे अशा परिस्थितीत कलम ७ (९) नुसार अभिप्रेत होते. याकरिता जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-००) अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवाजी भाऊराव बनकर,<br>रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद,<br>जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गटसाधन कार्यालय, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिवाजी भाऊराव बनकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना - प्रतिनिधी - श्री. बी. व्ही. वानखेडे, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना<br>- श्री. जी. एम. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०५-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या एकूण मुद्दयांपैकी पहिल्या मुद्दयाची माहिती सर्व शिक्षक शाळानिहाय इत्यादीची अपिलार्थीस दिनांक १६-०४-२००९ रोजी पुरविण्यात आली आहे व ही माहिती अपिलार्थीस दिनांक २३-०४-२००९ रोजी मिळालेली आहे. ही माहिती मिळाली असल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थी यांनी शिक्षकांच्या व्यक्तीगत बाबीबाबत जसे ज्या घरात राहतात त्या घरमालकाचे नाव, कोठून येतात इत्यादी माहिती मागितली आहे. ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे ८ (१) (ज) नुसार अपिलार्थीस देय होत नाही आणि ती देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे शिक्षकांची शाळेत येणेजाणे करण्याचे अंतर व कोठून येतात ही माहिती ठेवण्यात येत नाही त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. जी माहिती अपिलार्थीस देय होते ती अपिलार्थीस दिलेली आहे ही बाब आयोगास योग्य असल्याचे आढळून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊराव बनकर,रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद,

जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अब्दुल कादर मोमीन,<br>बागवान मोहल्ला, जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, जालना - श्री. पी. के. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याकारणाने दिनांक ०६-१२-२००८ रोजी अपिलार्थीस देता येणार नाही असे कळविण्यात आले व अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढला आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांच्याकडे कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपील केले. तथापि यावर सुनावणी झाल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या दिनांक १०-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घ्यावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल कादर मोमीन, बागवान मोहल्ला, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिलींद वसंतराव विटेकर, : अपीलकर्ता
रा. सोनपेठ, जि. परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी, :
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री. मिलींद वसंतराव विटेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, सहा.धर्मादाय आयुक्त कार्यालय,परभणी - श्री. सी. के.उप्पलवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहा. धर्मादाय आयुक्त, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.१२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.उपस्थितांनी त्यांची बाजू आयोगासमोर मांडली.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि. ३१.१०.२००८ रोजी देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.११.२००८ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दि. १५.१२.२००८ रोजी निर्णय दिलेला आहे. या निर्णयामध्ये, पहिल्या तीन मुद्यांवरील माहिती देण्यात आली असून मुद्दा क्र. ४ द्वारे मागितलेली माहिती चौकशी प्रकरणाशी संबंधित असल्यामुळे व चौकशी पूर्ण न झाल्यामुळे देता येत नाही, असे नमूद केले आहे.अपिलार्थी यांनी आज रोजी त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य करुन खालील मुद्यासंदर्भातील माहिती अप्राप्त आहे, असे आयोगास अवगत केले.

१) ०१.०१.१९८५ ते १५.१०.२००८ या कालावधीमध्ये कार्यालयाकडे प्रत्येक वर्षी नोंदणी झालेल्या संस्थांची वर्षनिहाय संख्या मागितली आहे. त्यांना या संपूर्ण कालावधीतील संस्थांच्या नोंदणीची एकत्रित ८९८४ ही संख्या कळविण्यात आली आहे. त्यामुळे या संख्येचे वर्षनिहाय आकडेवारी उपलब्ध असलेली कागदपत्रे देण्यात यावीत.

२) संस्थेच्या नोंदणीनंतर संस्थेच्या कामकाजाबाबत निकष, नियम व अटी यांचे पालन न झाल्यामुळे करण्यात आलेल्या कारवाईबाबतची वर्षनिहाय माहिती .

३) सोनपेठ, जि.परभणी येथील श्री माधवाश्रम शिक्षण संस्था, सोनपेठ, जि.परभणी या संस्थेच्या संदर्भात प्राप्त तक्रारी व त्यावर करण्यात आलेली कारवाई याबाबत जी चौकशी सुरु आहे, त्याबाबतच्या सद्यपरिस्थितीसंदर्भात कागदपत्रे.

वरील कागदपत्रे अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीअन्वये देय होतात, असे आयोगाचे मत आहे.तरी जन माहिती अधिकारी यांना ही कागदपत्रे अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिलींद वसंतराव विटेकर,दत्तकृपा, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, जि. परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहा.धर्मादाय आयुक्त कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दामोधर शंकरराव घुगे, : अपीलकर्ता
रा.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, परभणी- श्री. आर.एफ. शेख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना- प्रतिनिधी - श्री. डी.एन.गलबे, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०२.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०५.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून ही माहिती देण्याकरिता त्यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ अपूरे आहे, त्यामुळे ही माहिती देता येणे शक्य नाही, असे अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ११.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलार्थी यांना ही माहिती व्यक्तिशः आवश्यक होती व त्यांनी अशाप्रकारे अपिलार्थीस माहिती नाकारणे योग्य नाही, असे आयोगाचे मत आहे. माहिती व्यापक स्वरुपात असेल तर अधिनियमातील कलम ७(९) खाली अपिलार्थीस माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अशाप्रकारे अपिलार्थीस त्यावेळी अभिलेखे पहाणीस उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सांगितले.आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांना या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन त्यातील काही आवश्यक कागदपत्रे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामूल्य द्यावे लागतील. यासाठी त्यांनी एक दिवस सुनिश्चित करावा व याबाबतची कल्पना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.०० ) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील काही आवश्यक कागदपत्रे अपिलार्थीस छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर शंकरराव घुगे, मु.पो.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राम रुस्तुमराव लांडे, : अपीलकर्ता
रा. अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम विभाग),औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राम रुस्तुमराव लांडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग),औरंगाबाद- श्री. सी.व्ही. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२००९ |

(फेरसादर दि.२३.०३.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. औरंगाबाद अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहितीमध्ये- औरंगाबाद,कन्नड,सिल्लोड व वैजापूर या उपविभागाशी संबंधित सन २००७ ते दि.१०.१२.२००८ पर्यंतची -जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी शिफारस केलेल्या कामांची यादी, कामनिहाय मोजमाप पुस्तिकांच्या प्रती, काम करणाऱ्या एजन्सी व शाखा अभियंत्यांच्या नावासह यादी - या माहितीचा समावेश होता. या करिता संबंधित उपविभागांकडे अपिलार्थीचा अर्ज दि. १२.१२.२००८ रोजी वर्ग केला आहे. त्यानंतर उपविभागाने त्यांना कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पहाणी करावी, असे दि. १९.१२.२००८, २९.१२.२००८ व २०.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि आज रोजी अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर असे सांगितले की, अशाप्रकारे पहाणीसाठी कोणतेही अभिलेखे त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. याकरिता जन माहिती अधिकारी यांना या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध करुन त्यातील काही आवश्यक कागदपत्रे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामूल्य द्यावे लागतील. यासाठी त्यांनी एक दिवस सुनिश्चित करावा व याबाबतची कल्पना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे द्यावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी एक दिवस (सकाळी ११.०० ते सायं.५.०० ) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील काही आवश्यक कागदपत्रे अपिलार्थीस छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामूल्य द्यावेत. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम रुस्तुमराव लांडे, रा. होळकर नगर,अंबड, ता.जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद (बांधकाम विभाग),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विकास कुमार बागडी, : अपीलकर्ता
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.विकास कुमार बागडी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना - श्री. परशुराम सिताराम पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद- श्री. भगवान न.बोंदरवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०४.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी आपले म्हणणे आयोगासमोर मांडले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती व्यापक स्वरुपाची होती. यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागणार असल्यामुळे माहिती पुरविता येणार नाही, असे दिनांक ०१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २१.०२.२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे असे आदेशित केले होते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना तात्काळ देण्यात यावी. या निर्णयानंतर अपिलार्थीस माहिती पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली व अपिलार्थी यांनी सर्व अभिलेखे पाहिले, तसेच माहिती अधिकाराच्या अर्जानुसार सर्व माहिती त्यांना मिळाली आहे व सदर अर्ज निकाली काढण्यामध्ये काही हरकत नाही, असे अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविलेले आहे,असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात पुराव्यादाखल कागदपत्रे आयोगास अवलोकनास्तव सादर केली.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकासकुमार बागडी,नाथ गल्ली, सदर बाजार, जालना-४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी, : अपीलकर्ता
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, मा. राज्य माहिती आयोगाने द्वितीय अपील क्र.२१२०, निर्णय दि.१७.१२.२००८ च्या संदर्भात शिस्तभंगविषयक कारवाई झाल्याबाबतच्या माहितीचा तपशील मागितला आहे व त्यासंदर्भातील माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तथापि आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, दि. १४.०१.२००९ व २५.०३.२००९ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता कार्यालयातर्फे अपिलार्थीस या चौकशी प्रकरणाची सद्यस्थिती कळविण्यात आलेली आहे.अपिलार्थीस त्यांच्या कागदपत्रांमध्ये तदनंतर तसे आढळून आले असल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये मान्य केले.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी, राजधानी हॉटेलच्या पाठीमागे, न्यू बसस्टॅन्ड रोड,परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोपीनाथ विश्वनाथ भंडारे, : अपीलकर्ता
रा.थडीउक्कडगाव, ता.सोनपेठ,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. वाल्मिक यादवराव पंडीत, अव्वल कारकुन | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०५.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे १ ऑगस्ट,९७ ते ३१ ऑगस्ट,९८ या कालावधीची पोलीस पाटील रिक्त पद व भरतीविषयी माहिती मागितली आहे. सन १९९९ मध्ये सेलू उपविभागातील परभणी,गंगाखेड,पूर्णा,सोनपेठ व पालम तालुक्याचा समावेश परभणी उपविभागामध्ये झालेला आहे. त्यानुसार कागदपत्रे व संचिका तिकडे वर्ग झालेली आहे व सध्या अस्तित्त्वात असलेल्या सेलू उपविभागातील सन १९९७ मधील पोलीस पाटील रिक्त पदाविषयी माहिती शोधण्याचे काम सुरु असून उपलब्ध होताच कळविण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सेलू यांनी संदर्भिय नस्तीचा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार काही कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रे आयोगास अवलोकनास्तव सादर केली. त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भातील माहितीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील व उर्वरित माहितीच्या संचिका शोध घेऊन महाराष्ट्र अभिलेख अधिनियम २००५ अन्वये त्या अभिलेखांचे जतन करण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांना करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपीनाथ विश्वनाथ भंडारे, रा.थडी उक्कडगाव, पो.सोनपेठ, ता.सोनपेठ, जि. परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण नागनाथराव गिरी, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त केल्याची तारीख | दि. ०६.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५.०५.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

त्यामुळे सदर प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने सदर अपील प्रकरणाची सुनावणी तूर्त स्थगित करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण नागनाथराव गिरी,९८/१, स्वातंत्र्यसैनिक कॉलनी, लोकमान्यनगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत लक्ष्मणराव रामपुरकर, : अपीलकर्ता
रा.चारठाणा, ता.जिंतुर, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर),उपविभाग परभणी - श्री. आर.एफ.शेख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -कार्यकारी अभियंता (स्था.स्तर),विभाग जालना - प्रतिनिधी- श्री. डी.एन.गलबे, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०६.२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२.०६.२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दि. ०६.०६.२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात मजूरांच्या हजेरीपटाची प्रत उपविभागीय कार्यालयात पहाणीसाठी उपलब्ध आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी पहाणी केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना यांनी त्यांच्या कार्यालयात या माहितीच्या अभिलेखाची पहाणी करण्याकरिता अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत. या अभिलेखांची पहाणी केल्यानंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना यांनी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत लक्ष्मणराव रामपुरकर, द्वारा श्री. आर.आर.सिरस, मन्नालाल सराफनगर, अमृतेश्वर मंदिरासमोर, जुना जालना-४३१ २१३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपीलकर्ता
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक,सहकारी संस्था, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

त्यामुळे सदर प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने सदर अपील प्रकरणाची सुनावणी तूर्त स्थगित करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेकनगर, वसमतरोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाष सखाराम टोम्पे, : अपीलकर्ता
रा.सेलू, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपजिल्हाधिकारी, सेलू, जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सुभाष सखाराम टोम्पे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी - प्रतिनिधी -श्री. वाल्मिक यादवराव पंडित, अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर जिल्हाधिकारी,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी एकूण २९ पृष्ठांची माहिती त्यांनी दि. २३.०३.२००९, १९.०४.२००९ व ०६.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. अपिलार्थीने ही बाब मान्य केली. तथापि अपिलार्थी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, त्यांना त्यांचे स्वत:चे जातीचे प्रमाणपत्र मिळवावयाचे आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी व माहिती त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितली आहे. माहिती अधिकारी यांनी त्यांना काही माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे कळविले आहे. ते निरक्षर असल्यामुळे त्यांना ही माहिती संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेणे अवघड झाले आहे. यामुळे जात प्रमाणपत्र मिळू शकले नाही. ते प्राप्त करण्याकरिता कोणकोणत्या बाबी सादर कराव्या लागतात, त्या कागदपत्रांची यादी त्यांना आवश्यक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे असे मत आहे की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस जात प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल करताना ज्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते, त्याची यादी व यासंदर्भात संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे/शासन निर्णय/परिपत्रके इ. Download करुन Hard Copy च्या स्वरुपात द्यावे लागतील, जेणेकरुन अपिलार्थी यांना त्यांचे जातीचे प्रमाणपत्र मिळविणे सुलभ होईल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावीत.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष सखाराम टोम्पे,"टोम्पे निवास",लक्कडकोट,मु.पो.ता.सेलू,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सेलू, जि.परभणी-४३१ ५०३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती भारती श्रीधरराव पोफळी, : अपीलकर्ता
व्दारा शाम बारडकर सौमित्र चौसाळकर कॉलनी,
अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, योगेश्वरी नूतन विद्यालय, योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, योगेश्वरी नूतन विद्यालय, योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड<br>- श्री. ज्ञानोबा नारायणराव कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर तारीख नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०१-२००९ फेरसादर ०२-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रकरणात सध्याचे जन अपिलीय अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. सोनवणे यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी तसेच तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. सोनवणे यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी तसेच तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. सोनवणे यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती भारती श्रीधरराव पोफळी, व्दारा शाम बारडकर सौमित्र चौसाळकर कॉलनी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, योगेश्वरी नूतन विद्यालय, योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. सोनवणे, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड)

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वनाथ भाऊराव मगर, : अपीलकर्ता
रा. विश्वकमल, सागर फॅब्रीकेशन समोर, शाहूनगर,
पांगरी रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २१-११-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०२-२००९ |

फेरसादर दिनांक
३०-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दृष्टोत्पत्तीस येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी ज्या पध्दतीत माहिती त्यांच्या कार्यालयात ठेवली आहे त्या पध्दतीत ती अपिलार्थीस दिली आहे असे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेताना जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दिनांक २९-१२-२००८ रोजी असा निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना अपूर्ण माहिती दिली आहे त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे पूर्ण माहिती देण्यात यावी. अपिलार्थी यांचा मुद्दा क्रमांक २ बाबत आक्षेप आहे असे आयोगास आढळून येत आहे. आज रोजी या प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास कळू शकली नाही. प्रथम अपिलातील निर्णयानुसार जन माहिती अधिका-याने उर्वरीत माहिती अपिलार्थीस दिली नसल्यास ती अपिलार्थीस तात्काळ द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे यापूर्वी माहिती दिली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथ भाऊराव मगर, रा. विश्वकमल, सागर फॅब्रीकेशन समोर, शाहूनगर,

पांगरी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वेश विजयकुमार शेटे, : अपीलकर्ता
रंगारगल्ली, किल्लेधारुर, तालुका किल्लेधारुर,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, किल्लेधारुर, तालुका किल्लेधारुर,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, किल्लेधारुर,
तालुका किल्लेधारुर, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, किल्लेधारुर, तालुका किल्लेधारुर, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किल्लेधारुर, तालुका किल्लेधारुर, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११-११-२००८ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत त्यामुळे आयोगास प्रकरणात सद्यस्थिती अवगत होऊ शकत नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किल्लेधारुर, जिल्हा बीड यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किल्लेधारुर, जिल्हा बीड यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किल्लेधारुर, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वेश विजयकुमार शेटे, रंगारगल्ली, किल्लेधारुर, तालुका किल्लेधारुर, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, किल्लेधारुर, तालुका किल्लेधारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किल्लेधारुर, तालुका किल्लेधारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर भाऊराव शिंदे, | : | अपीलकर्ता |
| मु. पो. ढेकूनमोहा, तालुका जिल्हा बीड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०६-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-१०-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत त्यामुळे आयोगास प्रकरणात सद्यस्थिती अवगत होऊ शकत नाही. तथापि आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी

त्यांच्या दिनांक १३-०६-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, बीड यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०७-२००७ रोजी नोंदणी डाकेने पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २०-१०-२००८ रोजी सुनावणी घेतल्याचे आढळून येत आहे व सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते असे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये अर्जासंबंधात विस्तृत विवेचन देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये काहीही बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर भाऊराव शिंदे, मु. पो. ढेकूनमोहा, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

प्रा. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपीलकर्ता
व्दारा यक्रंस निवास, अंबावेस, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी, :
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधिव्याख्याता, शासकीय अध्यापक महाविद्यालय,<br>अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड<br>- डॉ. सानप एम. व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्या, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड - डॉ. मुळे एस. एस. | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्रीमती देशपांडे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-१२-२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २४-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी केलेला दिनांक १८-१२-२००८ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांना दिनांक २७-१२-२००८ रोजी प्राप्त झाला. तदनंतर माहिती तयार ठेऊन दिनांक २३-०१-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे अपिलार्थीस रुपये २५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याकरिता लेखाशीर्ष, इत्यादीचा तपशीलही कळविण्यात आलेला आहे. ही बाब आयोगापुढील कागदपत्रावरुन स्पष्ट होत आहे. अपिलार्थी यांनी अद्यापपावेतो शुल्काचा भरणा केलेला नाही. अपिलार्थीकडून शुल्क प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. प्रा. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा यक्रंस निवास, अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, शासकीय अध्यापक महाविद्यालय,

अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वैजनाथ नारायण माने,<br>सावतामाळी मंदिराजवळ, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड<br>- श्री. पी. पी. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०४-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक १५-०४-२००९ रोजी प्रथमतः देण्यात आली व त्याचप्रमाणे उर्वरीत माहिती दिनांक ०१-०२-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व यावरील अपिलार्थीची पोहच त्यांच्या दप्तरी आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली आहे असे वरील सर्व बाबीवरुन दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वैजनाथ नारायण माने, सावतामाळी मंदिराजवळ, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोहर चिमाजी चाळक, : अपीलकर्ता
संजय नगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. के. एच. जगरवाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई,<br>जिल्हा बीड - श्री. विक्रम सदाशिव देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दिनांक ०१-०१-२००५ पासून दिनांक २६-०२-२००९ पर्यंतची श्रावणबाळ योजनेबाबत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती व ती संकलीत करण्यास त्यांना काही कालावधी लागणार होता, ही माहिती आता उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती मागितली आहे तथापि अपिलार्थी यांनी माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क केलेला नाही.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः पाहणीसाठी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे मत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई जिल्हा बीड यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-००) अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर चिमाजी चाळक, संजय नगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र शामराव साळूंके, : अपीलकर्ता
सोमेश्वर चौक, संजय नगर, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. के. एच. जगरवाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई,<br>जिल्हा बीड - श्री. विक्रम सदाशिव देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १९-०३-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दिनांक ०१-०१-२००७ पासून दिनांक १९-०३-२००९ पर्यंतची श्रावणबाळ, संजय गांधी व इंदिरा गांधी योजनेबाबत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती व ती संकलीत करण्यास त्यांना काही कालावधी लागणार होता, ही माहिती आता उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिश: माहिती मागितली आहे तथापि अपिलार्थी यांनी माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क केलेला नाही.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिश: पाहणीसाठी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे मत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई जिल्हा बीड यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-००) उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र शामराव साळूंके, सोमेश्वर चौक, संजय नगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लक्ष्मण मारुती शिंदे,<br>रा. करचुंडी, तालुका जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, बीड<br>- प्रतिनिधी - श्री. शेख ए. एम., लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड<br>- प्रतिनिधी - श्री. एस. एस. मुळे, अ. का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती प्रकरण जिल्हा सत्र न्यायालय, बीड येथे न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांना देता येत नाही व संबंधित संचिका प्राप्त होताच माहिती देण्यात येईल असे अपिलार्थीस दिनांक १०-०२-२००९ रोजी कळविण्यात आले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक २५-०२-२००९ रोजी निर्णय घेताना नमूद केले आहे की, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे संचिका असल्यामुळे माहिती देता आली नाही असा जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला आहे त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. आज रोजी सांगण्यात आले की, सदरची संचिका आता विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, बीड यांच्या कार्यालयात न्यायालयाकडून प्राप्त झाली आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयासमोर असलेली मुद्दे वगळून इतर मुद्दयांबाबत अपिलार्थीने मागितलेल्या सर्व माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण मारुती शिंदे, रा. करचुंडी, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, बीड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साहेबराव देवराव पोटभरे, : अपीलकर्ता
जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव मजंरथ रोड,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७-०२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०३-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०४-२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०४-२००८
फेरसादर दिनांक
१९-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव, जिल्हा बीड यांनी दिनांक २७-०२-२००८ रोजी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०२-०४-२००८ रोजी निर्णय घेताना जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती उपलब्ध अभिलेखावरुन बरोबर आढळून येत आहे ही बाब अपिलार्थीस दिनांक ०२-०४-२००८ रोजी कळविण्यात येऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साहेबराव देवराव पोटभरे, जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव मजंरथ रोड, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभागीय पोलीस

अधिकारी कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादेव भिमराव केंद्रे, : अपीलकर्ता
रा.भोजनकवाडी, ता.परळी, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय (ई.जी.एस.),बीड

जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

जिल्हाधिकारी,बीड कार्यालयामार्फत आज दिनांक ०३.०२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठास प्राप्त फॅक्स संदेशाद्वारे सदर प्रकरणात त्यांच्या कार्यालयाचे म्हणणे सादर करण्याकरिता मुदतवाढ मिळण्यासाठी विनंती करण्यात आली. ती मान्य करण्यात येत आहे व सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव भिमराव केंद्रे, भोजनकवाडी, पो.धर्मापूर, ता.परळी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी, (रो.ह.यो.),जिल्हाधिकारी कार्यालय, ,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बशीर दगडूभाई ऊर्फ दाऊदभाई तांबोळी, : अपीलकर्ता
रा.कडा, ता.आष्टी, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी, कडा,
ता.आष्टी, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी, :
पंचायत समिती, आष्टी, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कडा, ता.आष्टी,जि.बीड- श्री. आर.बी.कवडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, आष्टी,जि.बीड- श्री. एस.ए.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०७.२००९ (फेरसादर दि. ३०.१०.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे कसबे कडा, ता.आष्टी येथील इ.स.१९५१ मधील घर नं. ११ अ व त्यानंतर ६१४, ६१५ जुना व नवा १११९,११२० या घरांच्या मालकीहक्क व फेरफारसंदर्भात माहिती मागितली होती. त्यातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि. ०३.०२.२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना ती प्राप्त झाल्याची त्यांची पोच उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपील करताना दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे नमूद केले आहे. याकरिता त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांच्याकडे त्यासंदर्भात दाद मागण्यासाठी स्वतंत्रपणे अर्ज करण्यास आयोग त्यांना सूचवित आहे व आयोगाच्या स्तरावर अपील प्रकरण बंद करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बशीर दगडूभाई ऊर्फ दाऊदभाई तांबोळी, रा.कडा,ता.आष्टी,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत,कडा, ता.आष्टी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, आष्टी,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वसंतराव मारुती जोगदंड, : अपीलकर्ता
रा.बर्दापूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे, मंडळ अधिकारी, पुरी यांनी दि. ०२.०२.२००९ रोजी केलेल्या पीक पंचनाम्याची प्रत मागितली आहे. तसेच कुंभाराला कोणती गायरान जमीन दिली, त्याबाबतची कागदपत्रे मागितली आहेत. ही माहिती दिल्याचे कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. माहिती अधिकाऱ्यास अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वसंतराव मारुती जोगदंड, मु.पो.बर्दापूर, ता.अंबाजोगाई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शरद एस.काळे,<br>रा. गेवराई, जि.बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, गेवराई, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, गेवराई, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पु),तहसील कार्यालय, गेवराई,जि.बीड- श्री. एल.एन.धस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, गेवराई,जि.बीड - श्री. व्ही. एस.देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली सन २००६ ते २००९ या कालावधीची माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आली नाही. तथापि आज रोजी माहिती उपलब्ध असून ते अपिलार्थीस देऊ शकतात. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यास विनामूल्य द्याव्या लागतील. त्याचप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु) श्रीमती सुमन मोरे यांनी कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती दिलेली नाही, असे दिसून येत आहे. याकरिता यापुढे त्यांनी, त्यांच्याकडे माहितीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) चे तंतोतंत पालन होईल, याची दक्षता घेणे आवश्यक आहे, असे तहसीलदार,गेवराई यांनी त्यांना सूचित करावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित साक्षांकित प्रती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु),तहसील कार्यालय,गेवराई श्रीमती सुमन मोरे यांनी भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित मुदतीत त्यांच्याकडून दिली जाईल, याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड.शरद शेषेराव काळे, सरस्वती कॉलनी नं.२, गेवराई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सी. व्ही.सानप, : अपीलकर्ता
रा.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, गेवराई, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, गेवराई, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (निवडणूक),तहसील कार्यालय,गेवराई,जि.बीड - श्री.एल.एन.धस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,गेवराई,जि.बीड - श्री. व्ही.एस.देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती दि. २९.०५.२००९ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाने पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सी. व्ही. सानप, मेन रोड,गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय बाबुराव यरपुरवाड,<br>रा.जांब बु.ता. मुखेड, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, जांब बु, ता.मुखेड,<br>जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.११.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२००९<br>(फेरसादर दि. १६.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी २००४ पासून दि. ११.११.२००८ पर्यंतची विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिल्याचे दिसून येत नाही. तथापि दि. २१.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भातील रेकॉर्ड वरिष्ठ कार्यालयास तपासणीसाठी व न्यायालयीन प्रकरणासाठी दिलेले आहे व सदरचे रेकॉर्ड उपलब्ध करुन आपणास माहिती देण्याकरिता अंदाजे एक महिना लागू शकतो, असे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी माहिती विस्तृत प्रमाणात मागितली आहे व याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागेल, असे आयोगाचे दृष्टीक्षेपात आले आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पहाणीकरिता त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन द्यावा. या अभिलेखांची पहाणी केल्यानंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, जांब बु., ता.मुखेड,जि.नांदेड यांनी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकित करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय बाबुराव यरपुरवाड,रा.जांब बु.,ता. मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, जांब बु., ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमाकांत मारोती जाधव, : अपीलकर्ता
रा.जांब बु.,ता.मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासक/सचिव,
विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या.,जांब बु.,ता.मुखेड,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.११.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०२.२००९<br>(फेरसादर,दि. १६.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती दिली असल्याचे त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था,मुखेड, जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,मुखेड, जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.०३.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमाकांत मारोती जाधव, रा. जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासक/सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी

मर्या. जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एकनाथ मल्हारराव बनसोडे, : अपीलकर्ता
रा.हदगाव, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड - श्री. झाडके शरद अच्युतराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड - प्रतिनिधी -श्री. शिंदे जी.एस., नायब तहसीलदार, भोकर,तहसील कार्यालय,भोकर जि.नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०३.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या एकूण ५ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात माहिती दि. १७.११.२००८ रोजी तसेच मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती दि. २०.११.२००८ रोजी दिलेली आहे. मुद्दा क्र. १,२ व ५ च्या संदर्भातील माहिती तहसीलदार कार्यालयांशी संबंधित असल्यामुळे संबंधित तहसीलदार यांनी अपिलार्थीस परस्पर द्यावी, असे कळविले आहे. त्यानुसार तहसीलदार माहूर यांनी दि. १९.१२.२००८ रोजी माहिती दिलेली आहे. इतर उर्वरित तहसीलदार यांना एक महिन्याच्या आत अपिलार्थीने मागितलेली माहिती द्यावी लागेल. संबंधितांकडून अपिलार्थीस या मुदतीमध्ये माहिती मिळेल, असे अपर जिल्हाधिकारी यांनी पहावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

संबंधित सर्व जन माहिती अधिकारी (तहसीलदार,माहूर वगळता) यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावीत व संबंधित सर्व जन माहिती अधिकारी हे या मुदतीत अपिलार्थीस माहिती पाठवतील, असे अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांनी पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एकनाथ मल्हारराव बनसोडे, नागसेननगर, हदगाव, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बालाजी बळीराम बंडे,<br>रा.मुखेड, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, मुखेड, जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,मुखेड, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, मुखेड, जि.नांदेड - प्रतिनिधी - नायब तहसीलदार (म), मुखेड, जि.नांदेड- श्री. एस.एफ.चिश्ती | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे, ती दि. १५.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर निर्णय घेताना दि. १८.०६.२००८ रोजी नमूद केले आहे की, सदर प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ४१ मुद्यांवर असल्यामुळे ती तयार करण्यास विलंब होत असल्यामुळे १५ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले व अपिलार्थीचे त्यावर समाधान झाल्यामुळे सदरचे प्रकरण बंद करण्यात येत आहे. तसेच मुद्यातील माहिती संबंधितास देण्यात आलेली आहे, अपूरी असल्यास पंधरा दिवसांच्या आत संबंधितास देण्यात यावी, अशीही नोंद आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. दि. ०१.०४.२००९ रोजी आयोगास प्राप्त झालेल्या अपिलार्थी यांच्या द्वितीय अर्जामध्ये त्यांनी दिलेली माहिती अर्धवट,दिशाभूल करणारी असल्यामुळे व माहिती मुदतीत न मिळाल्यामुळे विनामूल्य द्यावी व जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पुरविण्यामध्ये विलंब झाला आहे म्हणून त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही व्हावी, असे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगास अपिलार्थीने विस्तृत प्रमाणात माहिती मागितली आहे व सदरची माहिती विनामूल्य दिली आहे असे सांगितले. या सर्व बाबींचा विचार करता, तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यास तहसीलदार, मुखेड यांनी अधिनियमातील कलम ७(१) नुसार भविष्यात विहित मुदतीत माहिती पुरविण्यात येईल, याबाबत दक्ष राहण्यासाठी समज द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहितीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात मागितलेली माहिती विहित मुदतीत त्यांच्याकडून दिली जाईल, याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी बळीराम बंडे, शिवालय संपर्क कार्यालय, मु.पो.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय,मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा,<br>रा.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,देगलूर,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -सहायक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उपविभाग, देगलूर, जि.नांदेड -श्री. जी.व्ही.भांगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड - श्री. धोंडगे ए.टी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०४.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम कळविले होते. त्या पत्रावर अपिलार्थी यांची दि. २०.०१.२००९ रोजीची पोच आहे. ही बाब आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. तदनंतर अपिलार्थीस दि. २०.०३.२००९ रोजीचे पत्र दि. २२.०४.२००९ रोजी पोस्टाने अपिलार्थीस पाठविले आहे. ते त्यांना प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये मान्य केले. अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ वगळता उर्वरित माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. मुद्दा क्र.४ मध्ये मागणी केलेली संबंधित मार्ग लिपीक, श्री. एम.जे.तोडकर यांच्या दौरा दैनंदिनीची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, श्री. तोडकर,मार्ग लिपीक हे दि. १३.०८.२००७ ते ३०.११.२००८ या कालावधीत कार्यरत असताना ते कार्यालयात कामकाज करत नव्हते व क्षेत्रीय कर्मचारी म्हणून काम करीत होते व त्यांनी त्यांच्या दौरा दैनंदिनी कार्यालयात सादर केलेल्या नाहीत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्र. ९-६-२२०, उमर कॉलनी, मस्जीद समोर, देगलूर रोड,नांदेड

२.	जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उपविभाग, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जयप्रकाश नारायण पवार, : अपीलकर्ता
रा. आमदुरा, पो. मुगट, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०११ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि उपसंचालक, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड - डॉ. अ. रा. हसनाबादे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड<br>- श्री. व्ही. बी. इंगळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०२-२००९ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २०-०२-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय देताना नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पुन्हा एकदा देण्यात यावी व त्याप्रमाणे ती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली आहे असे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयप्रकाश नारायण पवार, रा. आमदुरा, पो. मुगट, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपीलकर्ता
रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी
मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, जिल्हा नांदेड - श्री. ए. जी. करपे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २१-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-०२-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०२-२००९ रोजी देण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना ही माहिती दिनांक २०-०३-२००९ रोजी खास दुतामार्फत मिळालेली आहे. अपिलार्थी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, मिळालेल्या माहितीमध्ये खालील बाबींचा समावेश नाही.

१. संबंधितांच्या एन. एम. आर. च्या कालावधीच्या प्रती,

२. संबंधितांचा रुपांतरीत प्रस्ताव उपविभागाकडून विभागाकडे पाठविला त्याची प्रत.

वरील दोन मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस साक्षांकीत प्रमाणित प्रतित द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे साक्षांकीत प्रमाणित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय बाबुराव यरपुरवाड,<br>रा.जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या.,<br>जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या.,<br>जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जावर काय कार्यवाही केली हे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, जिल्हा नांदेड यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या दिनांक ०७-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, जिल्हा नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय बाबुराव यरपुरवाड, रा.जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या., जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाधव रमाकांत मारोती, : अपीलकर्ता
रा.जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांब बु.,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१४

२ सुनावणीची तारीख दि. ०४-०२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांब बु.,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड - श्री. पवळे केशव आनंदराव

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड
- श्री. कानडे संगमेश मल्लिकार्जुन

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ११-११-२००८

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१-११-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०२-२००९ फेरसादर दिनांक १६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या एका अर्जातील माहिती सन २००४ ते ११-११-२००८ पर्यंतची आहे. यामध्ये ग्रामपंचायतीला आलेले एकूण अनुदान, संपूर्ण तपशील योजनानिहाय, खर्चाच्या तरतुदीचे शासन परिपत्रकाच्या झेरॉक्स प्रती, खर्चाचा तपशील सर्व पावत्यासह, त्या त्या अनुदानातून आलेल्या कामाचे अंदाजपत्रकाच्या झेरॉक्स प्रती, एम. बी. च्या झेरॉक्स, वाटप करण्यात आलेल्या रकमेचा तपशील, कॅशबुक, पासबुकाची झेरॉक्स इत्यादी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या दिनांक ०१-११-२००८ रोजीच्या दुस-या अर्जात जानेवारी २००५ पासून ते ०१-११-२००८ पर्यंत ग्रामपंचायतीकडे आलेल्या सर्व शासन परिपत्रकाच्या सत्यप्रती व सभासदांचे हजेरीपट व नोटीसबुकच्या नकला इत्यादी माहिती मागितली होती. अपिलार्थीस ही माहिती देणे ग्रामपंचायतीला शक्य असल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे मत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांनी त्यांच्या ग्रामपंचायतीशी संबंधित जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांनी त्यांच्या ग्रामपंचायतीशी संबंधित जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून

दोन दिवस सुनिश्चित करुन (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-००) अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव रमाकांत मारोती, रा.जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, : अपीलकर्ता
रा. लोण खुर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, तलाठी कार्यालय, सजा लोण बु.,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, तलाठी कार्यालय, सजा लोण बु.,<br>तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०५-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मौजे लोणी बु., तालुका अर्धापूर येथील गट क्रमांक ४३ च्या वडिलोपार्जीत जमिनीच्या वाटणीसंदर्भातील कागदपत्रांची मागणी केली आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे आढळून येत नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस दिली नसल्यास ती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अद्यापपावेतो अपिलार्थीस दिली नसल्यास ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, रा. लोण बु., तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, सजा लोण खुर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, : अपीलकर्ता
रा. गडगा, तालुका नायगांव खै., जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, नायगांव खै., तालुका नायगांव खै.,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव खै., तालुका
नायगांव खै., जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, नायगांव खै., तालुका नायगांव खै.,<br>जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव खै., तालुका<br>नायगांव खै., जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०५-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये नायगांव तालुक्यातील ०१-०१-२००८ ते ३१-०१-२००९ या कालावधीतील अंत्योदय व बी. पी. एल. योजनेसंदर्भात माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतला किंवा कसे याचा तपशीलही आयोगास उपलब्ध कागदपत्रामध्ये आढळून येत नाही. या माहितीमधील प्रश्नार्थक बाबी सोडून इतर मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे आढळून येत नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस दिली नसल्यास ती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अद्यापपावेतो अपिलार्थीस दिली नसल्यास ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, रा. गडगा, तालुका नायगांव खै., जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, नायगांव खै., तालुका नायगांव खै., जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव खै., तालुका

नायगांव खै., जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सटवाराव शंकरराव धोंगडे, : अपीलकर्ता
वार्ड क्रमांक ९, बाजारगल्ली, हदगांव, तालुका हदगांव,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील :
कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ

शकली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मौजे चांभरा येथील सरकारी शेतजमीन शेत सर्व्हे नंबर ५२ व ५४ च्या बाबत दिनांक १९-०९-२००८ रोजी दिलेल्या अतिक्रमणाच्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागितली आहे जी अपिलार्थीस देय होत आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे आढळून येत नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस दिली नसल्यास ती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अद्यापपावेतो अपिलार्थीस दिली नसल्यास ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०४-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सटवाराव शंकरराव धोंगडे, वार्ड क्रमांक ९, बाजारगल्ली, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>मु. जानापुरी, पो. वडेपुरी, S.R.T. तालुका लोहा,<br>जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. झाडके एस. ए. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड - प्रतिनिधी - श्री. शिंदे गजानन संभाजीराव, नायब तहसीलदार, भोकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०३-२००९ |

७	अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख	दि. २८-०४-२००९

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. ०६-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली काही माहिती अपिलार्थीस दिनांक ०५-०३-२००९ रोजी देण्यात आली आहे. मुद्दा क्रमांक १ मधील गहू व तांदळाचे मंजूर नियतन व उचल केलेले धान्य याबाबत माहिती देण्यात आली असून ताळमेळाची माहिती ताळमेळाचे काम पूर्ण झाले नसल्याने देता येत नाही. मुद्दा क्रमांक ६, ७, ८ व ९ या मुद्दयांवरील माहिती ताळमेळाचे काम पूर्ण झाल्यावर देण्यात येईल. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २८-०४-२००९ रोजी निर्णय घेताना जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी धान्य कूपन ताळमेळाचे काम तात्काळ पूर्ण करावे व ताळमेळ अहवालाची प्रत अपिलार्थीस देण्यात यावी असा निर्णय दिला आहे. तथापि ताळमेळाचे काम अजूनही पूर्ण झालेले दिसत नाही. ही बाब जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या नजरेस आणून देण्यात येत आहे. कारण याबाबत सन २००४-०५ ते २००५-२००६ चे ताळमेळाचे काम पूर्ण होणे गरजेचे होते असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील उर्वरित माहिती वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध झाल्याबरोबर अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. सन २००४-२००५ व २००५-२००६ या कालावधीतील वर नमूद केल्याप्रमाणे ताळमेळाचे काम पूर्ण झालेले नाही याकडे जिल्हाधिकारी, नांदेड यांचे लक्ष वेधण्यात येऊन ताळमेळ प्रक्रिया त्वरीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने आणि या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याबाबत कलम १९ (८) (a) (४) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक	०४-०२-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, S.R.T. तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, : अपीलकर्ता
व्दारा- सौ. सुरेखा चंपतराव पाटील,
रा. संभाजीनगर, तरोडा बु. तालुका जिल्हा नांदेड - ०५

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा,
तालुका लोहा, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, , लोहा, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड - प्रतिनिधी - श्री. बी. एन. पुलबुडेवार, अ. का. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, , लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०५-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना सन २००२ ते २००८ या कालावधीतील लोहा तालुक्यातील एका अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्याच्या संदर्भात रॉकेल वाटपासंबंधीची विस्तृत माहिती मागितली आहे व ही माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. तथापि अपिलार्थी यांचे दिनांक ०३-०२-२०११ रोजीचे राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांना यासंदर्भात लिहिलेले पत्र आयोगापुढे आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२०११ रोजी माहिती मिळवून दिली आहे. ही बाब विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, व्दारा- सौ. सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा बु. तालुका जिल्हा नांदेड - ०५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, , लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बलराज रामराव देशमुख, | : | अपीलकर्ता |
| अध्यक्ष तथा सहायक कामगार आयुक्त, यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल, हॉल नंबर २१८, मेनरोड, लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २८-०७-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०१-२००९ फेरसादर दिनांक १०-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे आयोगास प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकली नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जावर काय कार्यवाही केली हे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बलराज रामराव देशमुख, अध्यक्ष तथा सहायक कामगार आयुक्त, यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल, हॉल नंबर २१८, मेनरोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर लक्ष्मणराव गिरी,<br>रा.उजनी,ता.औसा, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>उद्योग सहसंचालक, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>उद्योग सहसंचालक, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उद्योग उपसंचालक,औरंगाबाद- श्री. एस.जी. राजपूत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उद्योग सहसंचालक, औरंगाबाद - श्री. हेमेंद्र ओंकारगिरी गोसावी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०१.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९<br>(फेरसादर दि. २१.०४.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती देण्यात आलेली आहे. तथापि आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०५.०१.२००९ रोजी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलकर्ता उपस्थित होते. प्रथम अपिलावरील सुनावणीच्या इतिवृत्तांतामध्ये असे नमूद केलेले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस मिळालेली आहे व ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर लक्ष्मणराव गिरी, द्वारा बाळू किसन गिरी, मु.पो. उजनी (राधानगर), ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उद्योग उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उद्योग सहसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळकृष्ण गुंडाजी होळीकर,<br>रा.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, लातूर - श्री. व्ही. एस.जोगदंड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, लातूर- श्री. महेश सावंत | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०५.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात माहितीपोटी शुल्क ` १८/-इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दि. ०५.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार अपिलार्थीने रकमेचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दि. ३०.१२.२००८ रोजी माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असे सांगितले की, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २७.०२.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदारास दि. ३०.१२.२००८ रोजी पूर्ण, स्पष्ट, दिशाभूल न करणारी व समाधानकारक तसेच खरी माहिती देण्यात आली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी योग्य असल्याचे आढळून आले आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण गुंडाजी होळीकर, द्वारा सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालय, हरिभाऊनगर, लातूर -४३१५१२

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागनाथ राचय्या स्वामी, : अपीलकर्ता
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अति.जिल्हाधिकारी, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०५.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

त्यामुळे सदर प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागनाथ राचय्या स्वामी, २-६३, पार्वती मॅन्शन,कोळ्ळे गल्ली, निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सावंत लक्ष्मण नारायणराव, : अपीलकर्ता
रा.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),अहमदपूर,जि. लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, अहमदपूर,जि. लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

सदर प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.प्रकरणात पुढील सुनावणीस संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी सुनावणीस उपस्थित राहतील, असे जिल्हाधिकारी,लातूर यांनी पहावे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०४-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सावंत लक्ष्मण नारायणराव,नागेश कॉलनी,अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय,अहमदपूर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर,जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपीलकर्ता
रा.सताळा खु.,ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपविभागीय कृषि कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी, :
उपविभागीय कृषि कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

सदर प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु.पो.सताळा (खुर्द), ता.अहमदपूर,जि.लातूर-४१३ ५२३.

२. जन माहिती अधिकारी, उपविभागीय कृषि कार्यालय,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, उपविभागीय कृषि कार्यालय,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादेव नागनाथ स्वामी, : अपीलकर्ता
रा. लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
धर्मादाय आयुक्त कार्यालय,लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर - श्री. एन.एस.क्षीरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - धर्मादाय उपआयुक्त, लातूर | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.०५.२००८,१२.०६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०९.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.१२.२००८ (फेरसादर दि. २७.०७.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १६.०५.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दि. ०७.०६.२००८ रोजी देण्यात आली आहे. ही बाब उपलब्ध कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातील न्यासाबाबत जी माहिती उपलब्ध आहे, ती माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १८.०९.२००८ रोजी निर्णय दिला आहे व अपिलार्थीचे अपील खारीज केले आहे. आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने दि.१८.१२.२००८रोजी दाखल केलेले द्वितीय अपील त्रूटींच्या पूर्ततेकरिता अपिलार्थीस परत करण्यात आले होते. सदर अपील त्यांनी दि. २७.०७.२००९ रोजी फेरसादर करुन दि. १२.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जाची व दि. १३.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत सादर केली. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या दि. १८.०९.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये संबंधित देवस्थानाच्या समितीच्या विश्वस्तांना अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे. दि. १२.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती मिळाली नसल्यास देय माहिती अपिलार्थीस प्राप्त होईल, असे धर्मादाय उपआयुक्त, लातूर यांना पहावे लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.महादेव नागनाथ स्वामी, विक्रमनगर,श्री गजानन महाराज मंदिराशेजारी, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपीलकर्ता
रा. उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.०४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त केल्याची तारीख | दि. ०५.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०४.०८.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.११.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

सदर प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,माणिकनगर,माणिक चौक, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रदीप शिवाजी घुगे,<br>रा.अणदुर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक, महाग्रेप्स पुणे | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पणन संचालक, म.रा.पुणे | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - महाव्यवस्थापक,महाग्रेप्स,पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहसंचालक (पणन),म.रा.पुणे - प्रतिनिधी - श्री. आर.के. लाखे, उपसंचालक (पणन) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.११.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१२.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर संबंधित संस्थेचे जन माहिती अधिकारी व महाव्यवस्थापक, महाग्रेप्स,पुणे यांनी अपिलार्थीस दि. २३.०९.२००८ रोजी माहिती पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २३.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन दि. २९.११.२००८ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस माहिती मिळाली आहे याची खातरजमा त्यांनी केली आहे, असे दिसून येत आहे. अपिलार्थी सुनावणीसाठी अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती मिळाली आहे, असे आढळून येत आहे, असे नमूद करुन अपिलार्थी यांचे अपील फेटाळले आहे. अपिलार्थी यांना प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात नेमकी कोणती माहिती अपूर्ण आहे, याबाबत जन माहिती अधिकाऱ्यास प्रथम कळवावे लागेल. त्यावर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्याबाबतच्या त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या सत्यप्रती द्याव्या लागतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदीप शिवाजी घुगे, रा.अणदूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी, महाव्यवस्थापक, महाग्रेप्स, ई-१५, निसर्ग, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (पणन) पणन संचालनालय,म.रा.,सेंट्रल बिल्डिंग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय भास्करराव नायगावकर, : अपीलकर्ता
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हा परिषद, बांधकाम विभाग,उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३५९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३.१२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.१२.२००८ (फेरसादर-दि.०६.०९.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती दिली असल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णयानुसार जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दहा दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे. अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे तपशीलवार माहिती देण्यात आलेली नाही व द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊनही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली, संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय भास्करराव नायगावकर,समतानगर, मुख्य रस्ता, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विलास विष्णूदास मोरे, : अपीलकर्ता
रा.गुगळी धामणगाव,ता.सेलू, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४४१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.११.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०६.१०.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य केल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचा कागदोपत्री पुरावा नाही. आज सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास त्यांना अपिलार्थीस या माहितीच्या प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवाव्या लागतील. याची अंमलबजावणी होईल, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना व्यक्तिशः पहावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती दिली नसल्यास, संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णूदास मोरे,रा.गुगळी धामणगाव,ता.सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा पुरवठा कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. सपकाळ, नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, फुलंब्री | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद - श्री. वा. ग. कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-१२-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन १९८४ ते २००७ या कालावधीशी संबंधित ५१ स्वातंत्र्य सैनिकांच्या वडिलाच्या वारस फेरफाराच्या नकला मागितल्या आहेत. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे ही माहिती काढण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री खर्ची पडणार आहे. तरी अर्जदाराने तपशील देऊन एखाद्या स्वातंत्र्य सैनिकाबाबत माहिती मागितल्यास त्याचा शोध घेणे व ती पुरविणे शक्य होईल. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना दिनांक २०-०२-२००९ रोजी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस सात दिवसात माहिती देण्याचे नमूद केले आहे. संबंधित माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे व याकरिता त्रयस्थ पक्षाचे मत घेणे आवश्यक ठरते. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी यांनी सध्या तहसील कार्यालय, फुलंब्री येथे उपलब्ध असलेल्या या संदर्भातील कागदपत्रांची पाहणी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे मत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री यांनी जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री यांनी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस सुनिश्चित करुन (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-००) अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात याव्यात. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०२-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोर दगु साळूंके, : अपीलकर्ता
रा. १५३५, साळूंके गल्ली, वैजापूर, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
रोटेगांव, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. के. आर. गाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०५-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०२-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०२-०७-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०६-२००९ फेरसादर दिनांक २९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०२-२००९ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. अपिलार्थीस एकूण ६१७ पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थीच्या व्दितीय अपिलाच्या तपशीलावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसत आहे. तथापि अपिलार्थीने मिळालेली माहिती दिशाभूल करणारी आहे अशा मोघम स्वरुपाचा उल्लेख केला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाली आहे असे आढळून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर दगु साळूंके, रा. १५३५, साळूंके गल्ली, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यभान कडूबा साबळे, (पोखरीकर),<br>मु. पो. हर्सूल, दिक्षाभूमी नगर, घर नंबर २७६,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुर्यभान कडूबा साबळे, | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. बालाजी क्षिरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद<br>- श्री. वा. ग. कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत त्यांना दिनांक ०२-०६-२००९ रोजी खुलासेवजा कळविलेले आहे. त्याचप्रमाणे दिनांक १२-०३-२००९ रोजी सुध्दा कळविलेले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक माहिती विचारली आहे त्याचा आयोगापुढे ऊहापोह करुन या माहितीच्या संदर्भातील जी काही कागदपत्रे तहसील कार्यालयात उपलब्ध आहेत त्याच्या प्रती देय होतात असे आयोगाने सूचित केले. कागदपत्रांचा कालावधी १९६० पासूनचा जुना आहे. याकरिता कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना या कागदपत्रांची पाहणी उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे मत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयात ही माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयात ही माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस सुनिश्चित करुन (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-००) अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात याव्यात. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यभान कडूबा साबळे, (पोखरीकर), मु. पो. हर्सूल, दिक्षाभूमी नगर, घर नंबर २७६, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तात्रय त्र्यंबकराव पाथरकर, : अपीलकर्ता
फ्लॅट नंबर ७, संकेत रेसिडेन्सी, विनायक नगर, गारखेडा,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय,
रा. प., जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, रा. प., जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय,<br>राज्य परिवहन, जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन,<br>जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०६-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

प्रकरणात दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय त्र्यंबकराव पाथरकर, फ्लॅट नंबर ७, संकेत रेसिडेन्सी, विनायक नगर, गारखेडा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.          निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती राधाबाई बाळकृष्ण त्रिवेदी, : अपीलकर्ता
मुरली मनोहर मंदिर, कसुपारख गल्ली, सुपारी हनुमान रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका
खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, वैजापूर, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, वैजापूर, तालुका वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-०४-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १२-०५-२००९

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

प्रकरणात दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती राधाबाई बाळकृष्ण त्रिवेदी, मुरली मनोहर मंदिर, कसुपारख गल्ली, सुपारी हनुमान रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आर. जी. बिडवई, : अपीलकर्ता
'सरस्वती', ३८, रंजनवन सहकारी गृहनिर्माण संस्था,
सिडको, एन-९, जे-सेक्टर, नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आर. जी. बिडवई | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद<br>- श्री. टी. आर. साळवे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद - श्री. कि. रा. तवरेज | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | माहितीचा अर्ज दिसून येत नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २८-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जावर त्यांना दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी / चौकशीसाठी उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला असून चौकशीअंती निर्णय घेतला जाईल व आपणास कळविण्यात येईल असे कळविले होते.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भातील अर्जामध्ये उल्लेख केलेल्या प्रकरणावर काय कारवाई केली व काय कारवाई प्रगतीपथावर आहे याबाबत काहीही तपशील अद्यापपर्यंत त्यांना देण्यात आलेला नाही. ही बाब विचारात घेता यासंबंधातील नस्तीमधील संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. यानंतर अपिलार्थी पुढील योग्य ती कार्यवाही करु शकतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या प्रकरणातील संबंधीत नस्तीमधील कागदपत्राच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आर. जी. बिडवई, 'सरस्वती', ३८, रंजनवन सहकारी गृहनिर्माण संस्था, सिडको, एन-९, जे-सेक्टर, नवीन औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहनलाल अर्जूनदास शामनानी,<br>रा. प्लॉट नं. २४०, सतगुरु निवास, टिळकनगर, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक तथा तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद<br>- सौ. हेमलता वांगीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद - डॉ. भारत कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन आयोगास असे दिसून येते की, महसूल व वन विभागाच्या दिनांक १०-०८-२००१ रोजीच्या महाराष्ट्र जमीन महसूल (भूमि अभिलेखांच्या प्रतिंचे निरक्षण, शोध व पुरवठा) (सुधारणा) नियम २००१ मध्ये कागदपत्रांसाठी विविध शुल्क नमूद केले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील कलम ४ (१) (अ) (क) खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

| | |
|---|---|
| अ | (क) संबंधित विभागाने विशिष्ट अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च, दस्तऐवज, नकाशे इत्यादींची किंमत अगोदर निश्चित केली असेल त्याबाबतीत, |

तसेच माहिती अधिकार नियम २००५ कलम ४ (१) (अ) व (ब) मध्ये विविध शुल्क स्पष्ट केले आहे. अतः ज्या ठिकाणी संबधित विभागाने कागदपत्रे द्यावयासाठी शुल्क निश्चित केले असेल तेथे त्याप्रमाणे शुल्क आकारावे लागेल व उर्वरित ठिकाणी महाराष्ट्र माहिती अधिकार २००५ नियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्क देय ठरत आहे व याप्रमाणे या प्रकरणात शुल्क आकारावे लागेल. अपिलार्थीने जी प्रश्नार्थक माहिती मागितली आहे ती खारीज करुन इतर दोन बाबींची माहिती अपिलार्थीस देय होत आहे व जन माहिती अधिकारी यांना ती द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर या व्दितीय अपील प्रकरणात आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहनलाल अर्जूनदास शामनानी, रा. प्लॉट नं. २४०, सतगुरु निवास, टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विनोद एबिनेजर बत्तीसे,<br>घर नंबर १२८५, जिन्सीपुरा, छावणी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद<br>- श्री. एम. एल. पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. व्ही. व्ही. भाले, लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी हे दौ-यावर असल्यामुळे अनुपस्थित आहेत असे त्यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती प्रथमतः दिनांक १५-०५-२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक २५-०६-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली सर्व माहिती विनामूल्य देण्यात यावी. त्याप्रमाणे उर्वरित माहिती दिनांक १४-०७-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे अपिलार्थीस देण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे असे आयोगास आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनोद एबिनेजर बत्तीसे, घर नंबर १२८५, जिन्सीपुरा, छावणी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रणजीत हरिभाऊ मनोरे, : अपीलकर्ता
रेल्वे स्टेशन, जाहगिरदार कॉलनी, मुजीब सर्व्हिसिंग
सेंटरच्या बाजूला, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपजिल्हाधिकारी, कार्यक्रम समन्वयक, म. ग्रा. रोहयो,
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, कार्यक्रम समन्वयक, मग्रा. रोहयो,
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३५

२ सुनावणीची तारीख दि. ०८-०२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. रणजीत हरिभाऊ मनोरे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
उपजिल्हाधिकारी, कार्यक्रम समन्वयक, म. ग्रा. रोहयो,
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
अपर जिल्हाधिकारी, कार्यक्रम समन्वयक, मग्रा. रोहयो,
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ११-०२-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. २४-०२-२००९

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०५-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०८-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्यापही त्यांना मिळालेली नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०६-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दिनांक ०८-०५-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे व मुद्दा क्रमांक १ व २ बाबत ग्रामपंचायत स्तरावर झालेल्या कामाची माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडून तसेच यंत्रणा स्तरावर झालेल्या कामाची माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, परभणी व इतर कामांची माहिती वनीकरण विभागाकडून मागितली आहे व ही माहिती प्राप्त होताच आपणास पुरविण्यात येईल. अपिलार्थी यांनी परभणी जिल्ह्याची व जिल्ह्यातील आठ तालुक्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामाचे जॉब नंबर, मजुरांची यादी, खाते क्रमांक, गावांची नावे, तलावांची संख्या, माती नाले, शेततळे या संपूर्ण कामावर खर्च करण्यात आलेला निधी याची खुलासेवार अशी विस्तृत माहिती मागितली आहे. ती माहिती जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, कार्यक्रम समन्वयक, म. ग्रा. रोहयो, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे उपलब्ध होऊ शकणार नाही. ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फार मोठ्या प्रमाणात साधनसामग्री वळवावी लागेल. त्यामुळे जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे अशी उपलब्ध असलेली माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल व इतर माहितीबाबत अपिलार्थीस कामाचे नाव इत्यादी नेमका तपशील देऊन वेगळ्याने अर्ज करुन त्या त्या संबंधित यंत्रणेच्या तालुका स्तरावरील कार्यालयांकडून माहिती मागवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रणजीत हरिभाऊ मनोरे, रेल्वे स्टेशन, जाहगिरदार कॉलनी, मुजीब सर्व्हिसिंग सेंटरच्या बाजूला, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, कार्यक्रम समन्वयक, म. ग्रा. रोहयो, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, कार्यक्रम समन्वयक, म. गा. रोहयो, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, : अपीलकर्ता
इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापिका, हिंद सेवा मंडळाची दादा वामन जोशी
मराठी शाळा, (नवीन मराठी शाळा), श्रीरामपूर,
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी, :
हिंद सेवा मंडळ, अहमदनगरची दादा वामन जोशी नवीन
मराठी शाळा, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३६

२ सुनावणीची तारीख दि. ०८-०२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
मुख्याध्यापिका, हिंद सेवा मंडळाची दादा वामन जोशी
मराठी शाळा, (नवीन मराठी शाळा), श्रीरामपूर,
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर
- श्रीमती पुष्पा मधुकर शिंदे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, अहमदनगर
- श्री. अविनाश दामोदर आपटे

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १०-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, अहमदनगर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली कोणत्याच स्वरुपातील माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रे अवलोकन करता अपिलार्थीच्या दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने सदर अपील हे संबंधित शाळेच्या शिक्षण संस्थेकडे केल्याचे आढळून येत आहे. शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर हे जन अपिलीय अधिकारी होतात. यास्तव जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भातील प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा. सदर निर्णयाने अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर अपिलार्थी सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा. वरील प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच ४५ दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०२-२०११**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, नवीन औरंगाबाद तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, हिंद सेवा मंडळाची दादा वामन जोशी मराठी शाळा, (नवीन मराठी शाळा), श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत)

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी, : अपीलकर्ता
रा.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी (महसूल),
उपविभागीय अधिकारी कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी (महसूल),
उपविभागीय अधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,पैठण- प्रतिनिधी - नायब तहसीलदार, पैठण - श्री. जी.डी. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. के.पी.विसपुते, अ.का. | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री. त्रिभुवन मोहन कचरु | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०६.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्रथमतः दि. ११.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ३०.०७.२००९ रोजी निर्णय घेतला, त्यानंतर दि. १३.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्यात आली. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली. तथापि अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, खालील माहिती मिळालेली नाही.

१) श्री. मोहन कचरु त्रिभुवन यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्तीच्या प्रमाणपत्रासाठी पंचायत समितीला दिलेल्या अर्जाची प्रत.

२) चित्तेगाव गावातील श्री. मोहन कचरु त्रिभुवन यांचे संबंधित रेशनकार्डाची प्रत.

३) सेतू सुविधा केंद्र सुरु होण्याअगोदर श्री. मोहन कचरु त्रिभुवन यांना दिलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत.

वरील तीन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये शोध घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी. माहिती उपलब्ध नसल्यास त्यासंदर्भात कारणमिमांसा द्यावी.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीच्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे तीन मुद्यांवरील माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये शोध घेऊन हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

----------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी,रा.रंगारहट्टी, काळा पहाड,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोर कुंडलिक भिंगारे, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुनर्वसन अधिकारी,पुनर्वसन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. आनंद बोबडे, मंडळ अधिकारी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उच्च न्यायालयात गेले असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मोठया प्रमाणात होती. तथापि दि. ११.०६.२००९ रोजी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भात खुलासा दिलेला आहे व मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहितीच्या प्रतींसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे सी.डी.देण्यात आली आहे. तसेच यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी पुन्हा दि. १४.०८.२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे. आज सुनावणीच्या वेळी त्यांनी आयोगास असेही सांगितले की, मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील एकूण माहिती सुमारे १३०० ते १४०० पृष्ठांची होईल व ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. या माहितीशी संबंधित अभिलेखांची पहाणी एक दिवस निश्चित (सकाळी ११.०० ते सायं.५.००) करुन त्यामधील काही आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल. या व्यवस्थेसंदर्भातील तपशील अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावा लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखांची पहाणी एक दिवस निश्चित (सकाळी ११.०० ते सायं.५.००) करुन त्यामधील काही आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. या व्यवस्थेसंदर्भातील तपशील अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावा.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर पुंडलिक भिंगारे, रा. न्यु पहाडसिंगपुरा, हनुमान टेकडी परिसर, विज्ञान

संस्थेच्या शेजारी, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण दगडू माडूकर,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर भूमापन कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,भूमी अभिलेख, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण दगडू माडूकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद - प्रतिनिधी -श्री.एम.एस.शेळके, व.लि. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक, भूमी अभिलेख,औरंगाबाद - श्री. कि.रा.तवरेज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अद्यापपावेतो दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सुनावणीमध्ये आश्वासन दिले की, अपिलार्थी यांना द्यावयाची माहिती संकलीत करुन त्यांना त्वरित देण्यात येईल.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या मूळ अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती दिलेली नाही, हा प्रमाद त्यांच्याकडून घडला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २०(१) अन्वये ` २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत,असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना जमाबंदी आयुक्त,पुणे यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना तामिल होईल, असे प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना पहावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ` २५,०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जमाबंदी आयुक्त,पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तामिल करावयाची जबाबदारी अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांची राहील.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण दगडू माडुकर, फ्लॅट नं. ए-३, अमृत वैभव अपार्टमेंट, जालाननगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख,म.रा.,नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,विधानभवनासमोर,साधु वासवानी चौक,रेल्वेस्टेशनजवळ, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हरिश्चंद्र रामप्रसाद मेहता,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - श्रीमती अंजली धानोरकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी -विशेष भूसंपादन अधिकारी (विशेष घटक),नगर रचना विभाग,औरंगाबाद -प्रतिनिधी- श्री.अनिल कृष्णराव लखपती, सहायक नगररचनाकार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उच्च न्यायालयातील कामामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०९.२००९ रोजी प्रथम अपिलावर सुनावणीच्या वेळी सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाला.तथापि जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांना असे आढळून आले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीसंदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, नगर रचना विभाग,औरंगाबाद यांच्याकडे वर्ग केला. आज रोजी या कार्यालयाच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास असे सांगितले की, सदरचे प्रकरण त्यांच्याकडे सुरु नाही व नव्हते. त्यामुळे माहिती देता येत नाही.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने या प्रकरणात सारासार विचार करुन /तार्किक अनुमान काढून (Logical conclusion) कार्यवाही होणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. यास्तव जिल्हाधिकारी कार्यालयातील समन्वय भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) कृष्णा खोरे,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी या प्रकरणात लक्ष घालून विविध कार्यालयाशी समन्वय व संपर्क साधून अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने कार्यवाही करावी, असे आयोग सूचित करीत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती शोधणेस सुलभ होईल, याकरिता अपिलार्थीने समन्वय भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) कृष्णा खोरे, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे ए.आर.क्रमांक कळविणे आवश्यक राहील, ही कार्यवाही दोन महिन्याचे आत पूर्ण करावी लागेल.

या सर्व बाबी पाहता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

समन्वय भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) कृष्णा खोरे,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सदरचे प्रकरण हाताळावे व अपिलार्थीकडून ए.आर.क्रमांक प्राप्त होताच त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र रामप्रसाद मेहता,घर नं. ५-१-४७,उस्मानपूरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. समन्वय भूसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) कृष्णा खोरे, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सरदार हरजितसिंग सहानी, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, मौजे सातारा,
ता.जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सरदार हरजीतसिंग सहानी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, मौ. सातारा,जि.औरंगाबाद - श्री. ए.एम.गोराडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,औरंगाबाद - श्री. बालाजी क्षिरसागर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, विचाराधीन द्वितीय अर्जाच्या संदर्भातील मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे, त्यामुळे यासंदर्भात त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही व ते विचाराधीन द्वितीय अपील स्वखुषीने मागे घेत आहेत व या आशयाचे लेखी निवेदन त्यांनी आयोगासमोर सादर केले.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी, घर नं. ५-१-५५/१,उस्मानपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सातारा परिसर, ता.जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद- डॉ. म.मोइनोद्दीन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,औरंगाबाद - प्रतिनिधी - डॉ. एस.एम. नेरलकर,सहायक आयुक्त पशुसंवर्धन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली आठ मुद्यांवरील माहिती दि. १२.०६.२००९ व तदनंतर दि. ०१.०८.२००९ रोजी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांना दिलेल्या माहितीमध्ये बऱ्याच त्रूटी आढळून आल्याचे आयोगास सांगितले. याकरिता आयोगातर्फे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे की, या त्रूटीबाबतची त्यांची भूमिका आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा.पुणे यांच्याकडे मांडून त्यांच्या शंकांचे निरसन करु शकतात. आयुक्त,पशुसंवर्धन,म.रा.पुणे यांनी या माहितीवर तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्यांचे तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांचा खुलासा मागवून घेऊन चौकशी करावी.

या सर्व बाबींचा विचार करता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांना प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात त्यांची भूमिका आयुक्त,पशुसंवर्धन,पुणे यांना कळवावी व आयुक्त,पशुसंवर्धन यांनी या प्रकरणातील अपिलार्थीने कळविलेल्या माहितीच्या त्रूटीसंदर्भात चौकशी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर,द्वारा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद, खडकेश्वर,औरंगाबाद,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त,पशुसंवर्धन,म.रा., मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,पुणे -१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रल्हाद राणुबा महाकाळ,<br>रा.मोढा बु.,ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,ग्रामपंचायत मोढा बु.,<br>ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत मोढा बु.,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद - श्रीमती पी.एस.जहागिरदार | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत मोढा बु.ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद - श्री.डी.ए.डोंगरे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सिल्लोड, जि.औरंगाबाद - श्री. एस.एस. इंगळे | : | उपस्थित |
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड, जि.औरंगाबाद - श्री.तेजराव शामराव ढगे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | - |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५.०९.२००९ (फेरसादर दि.२७.१०.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची पहाणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. ३१.०८.२००९ रोजी दिली आहे. अपिलार्थी यांनी कागदपत्रांची पहाणी केली. याबाबतची पोच कागदपत्रांवर उपलब्ध आहे. प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०८.२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात आज सुनावणीच्या वेळी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून यामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्वीच माहिती दिली असल्यामुळे प्रकरण माहितीच्या हद्दीपर्यंत निकाली काढण्यात येत असल्याचे व याबाबत अपिलार्थीस काही माहिती दिशाभूल करणारी वाटत असल्यास त्यांच्या कार्यालयास स्वतंत्र तक्रार अर्ज सादर केल्यास त्याबाबत वेगळयाने चौकशी करता येईल,असा निर्णय घेतलेला आहे व याबाबत अपिलार्थी यांना दि. ०९.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रल्हाद राणुबा महाकाळ,मु.पो.मोढा बु. ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोढा बु.,ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती,सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण सोनाजीराव घोडके, : अपीलकर्ता
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,पैठण, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,पैठण, जि.औरंगाबाद - प्रतिनिधी -श्री. बी.एन.वाघ, नायब तहसीलदार (पु.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. के. पी.विसपुते, अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती घरगुती वापराच्या गॅस वितरणाशी संबंधित आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज तहसीलदार,पैठण यांनी इंडियन ऑईल कार्पोरेशन लि.बांद्रा (पू),मुंबई यांच्याकडे दि. २५.०५.२००९ रोजी पाठविला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १३.०७.२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की,अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी,पैठण यांच्या कार्यक्षेत्रात येत नाही,म्हणून अपील अमान्य करण्यात आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण सोनाजीराव घोडके, रा. १२३०, साळीवाडा,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मुकेश अर्जुनसिंग यादव,<br>बंदी क्र.६८४०,खुले कारागृह,औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, पारशिवनी,जि.नागपूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, पारशिवनी,जि.नागपूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,पारशिवनी,जि.नागपूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, पारशिवनी, जि.नागपूर-श्री. शिवराज पडोळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०९.२००९ (रा.मा.आ.नागपूर खंडपीठ)<br>०९.१०.२००९ (रा.मा.आ.औरंगाबाद खंडपीठ) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी आजारी असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत, असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली बहुतांश माहिती पंचायत समितीशी (ग्राम विकास विभाग) संबंधित आहे व एका मुद्याशी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे, ती माहिती त्यांनी अपिलार्थीने दिलेल्या औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहाच्या पत्त्यावर पाठविण्यात आली होती. अपिलार्थी हे सन १९९६ पासून जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करुन औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहास संपर्क साधला असता, अपिलार्थी यांना मोरशी, जि.अमरावती खुले कारागृह येथे वर्ग केल्याचे त्यांना समजले.अपिलार्थी हे जन्मठेपेची शिक्षा भोगत असले तरी त्यांना दारिद्रेरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र, घरकुल योजनेचा लाभ व कैद्याच्या आईवडिलांना सरकारी अनुदानासारखे लाभ देय आहेत किंवा कसे, इत्यादी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली असल्याचे दिसून येत आहे. याकडे 'प्रश्नार्थक' या दृष्टीने न पाहता, अपिलार्थीने त्यांनी मागितलेल्या माहितीबाबतचे शासननिर्णय/परिपत्रके/आदेश इत्यादींच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देय होतात व द्याव्या लागतील.ही बाब संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांच्या नजरेस तहसीलदार यांनी आणून द्यावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे व या माहितीच्या प्रती अपिलार्थीस ते सध्या ज्या कारागृहामध्ये स्थित आहेत, त्या तुरुंगाधिकारी, खुले कारागृह, मोरशी,जि.अमरावती यांच्यामार्फत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात. तुरुंगाधिकारी, खुले कारागृह, मोरशी,जि.अमरावती यांना अपिलार्थीस माहिती देण्याची व पोच घेऊन परत तहसीलदार यांच्याकडे पाठविण्याची जबाबदारी पार पाडावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुकेश अर्जुनसींग यादव, बंदी क्र. सि/६८४०, मार्फत तुरुंगाधिकारी,खुले कारागृह,मोरशी,जि.अमरावती

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,पारशिवनी, जि. नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पारशिवनी, जि.नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तुरुंगाधिकारी,खुले कारागृह,मोरशी,जि.अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. इम्रानखॉ एम.पठाण,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जासंदर्भात दि. २१.०७.२००९ रोजी विशेष भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांना कळविले आहे की, जानेवारी, १९८२ ते डिसेंबर, १९८३ या कालावधीतील भूसंपादनाबाबतची माहिती मागितली आहे. परंतु गावाचे नाव, तालुक्याचे नाव,जमीन संपादनाचे प्रयोजन इ.बाबींचा उल्लेख नाही, त्यामुळे संचिका शोधण्यास अडचण होत आहे व संचिका प्राप्त होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २०.०८.२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, शासकीय जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील अभिलेखात माहिती उपलब्ध आहे किंवा नाही, याचा शोध घ्यावा. माहिती उपलब्ध झाल्यास एक महिन्याचे आत अपिलार्थीस देण्यात यावी. तथापि या प्रकरणाची सद्यस्थिती कोणीही उपस्थित नसल्यामुळे आयोगास अवगत होऊ शकली नाही. माहिती अद्यापपावेतो अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्यास अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त तपशील पाठवावा जेणेकरुन माहितीचा शोध घेणे सुलभ होईल. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संदर्भ प्रथम जन माहिती अधिकारी यांना द्यावा व जन माहिती अधिकारी यांनी त्यासंदर्भाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इम्रानखॉ एम. पठाण, रा.व्हाईट हाउस, जहागीरदार कॉलनी, रेल्वेस्टेशन,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.